क्र. शाखा आर/मान्यता १९७४-७५
पुणे - ४११०१०.
दिनांक : २५ जून, १९७४

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका/प्राचार्य,

समर्थ विद्यालय, उरळी देवाची,
ता : हवेली, जिल्हा : पुणे

विषय : शाळेच्या प्रथम मान्यतेबाबत....

महोदय, महोदया,

या मंडळाच्या नियमावली क्र. ११(१) अन्वये मार्च १९७४ मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस विद्यार्थी पाठविण्यासी प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेला वरील शाळेचा अर्ज या कार्यालयात पोहोचला असून मंडळाच्या योग्य त्या समित्यांनी शाळेचा इ.१० वीचा तपासणी अहवाल व संबंधित शिक्षण उपसंचालक यांचे अभिप्राय विचारात घेऊन सदर अर्जाची छाननी केली.

याबाबत संबंधित समित्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, आपण अर्जात दिलेल्या माहितीवरून आपल्या शाळेत आढळूनआलेल्या खालील उणीवा व तसेच शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, ---पुणे---- यांनी तपासणी अहवालामध्ये आपणास निर्देशित केलेल्या अटी यांची त्वरीत पूर्तता करावी व अटींच्या पूर्ततेच्या अहवाल जुलै १९७४ अखेर या कार्यालयास न चुकता पाठवावा.

सदर अहवाल या कार्यालयात पोहोचल्यानंतरच आपल्या शाळेस अंतिम मान्यता देण्या-संबंधी चा विचार मंडळाच्या योग्य त्या समितीमार्फत होऊ शकेल. यासंबंधात लक्षात घेणे इष्ट आहे आहे की, मंडळाने दिलेल्या खालील अटींची पूर्तता करून अटी पूर्ण केल्याबद्दलचे पत्र जुलै १९७४ अखेर या कार्यालयास मिळेल अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास शाळेस मार्च १९७५ चे परीक्षेसाठी विद्यार्थी पाठविणेस परवानगी देणे कदाचित शक्य होणार नाही.

शाळेने पूर्तता करावयाच्या अटी.
- - - - - - - - - - - - - -

१) किमान ५ वर्षे शिकविण्याचा अनुभव असलेल्या (त्यापैकी २ वर्षे प्रशिक्षणोत्तर शिकविण्याचा अनुभव असावा) प्रशिक्षित पदवीधर मुख्याध्यापकांची नेमणूक करावी.

२) सामान्य विज्ञान आणि पदार्थ विज्ञान रसायनशास्त्र या विषयाच्या अध्यापनासाठी जून १९७४ पासून प्रशिक्षित शास्त्र पदवीधर शिक्षकांची नेमणूक करावी.

३) हिंदी विषय शिकविण्यासाठी योग्य गुणवत्ता असलेले (सिनिअर हिंदी शिक्षक सनद, हिंदी विषयातील पदवीधर किंवा समकक्ष परीक्षा पास असलेले) शिक्षक नेमावेत.

४) जून १९७४ पासून आणखी दोन प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची नेमणूक करावी.

५) चित्रकला विषयासाठी किमान डी टी.सी.पदविका असलेले शिक्षक नेमावेत.

६) शासकीय आवश्यकांची परिपूर्ण सवलेता प्रयोगशाळा पाहिजे.

कृपया सत्वर कार्यवाही करावी व कार्यालयास कळवावे अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

विभागीय सचिव,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ,

पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११०१०.

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पत्राची प्रत :

१) शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद - - - - - - - - -(शिक्षण निरीक्षक, बृ. मुंबई यांना सदर अग्रेषित) पुणे

२) त्यांना विनंती करण्यात येते की ऑगस्ट १९७४ मध्ये शाळेची तपासणी करताना वरील अटींची पूर्तता केली असल्याची खात्री करून घ्यावी व त्यांच्या निश्चित शिफारसींसह व शिक्षक यांच्या यादीसह इ. ११ वीचे तपासणी अहवाल १५ ऑगस्ट १९७४ पर्यंत शिक्षण उपसंचालकांकडे पाठवावेत. म्हणजे उपसंचालकांना सदर अहवाल ३१ ऑगस्ट १९७४ पर्यंत मंडळास पाठविणे शक्य होईल.

शिक्षण उपसंचालक, पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर विभाग यांना प्रत अग्रेषित

यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या विभागातील शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, यांच्याकडून संबंधित शाळेचे इयत्ता ११ वीचे तपासणी अहवाल उपलब्ध करून घेऊन उशीरात उशीरा ३१-८-१९७४ पर्यंतच्या त्यांच्या निश्चित शिफारसींसह या कार्यालयास पाठवावेत, अन्यथा संबंधित शाळांना मार्च १९७५ चे परीक्षेस विद्यार्थी पाठविणेस परवानगी देता येणार नाही.

३) सचिव, - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

[illegible]

यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी प्रत रवाना. त्यांना विनंती करण्यात येते की मागील पानावर घातलेल्या अटी सत्वर पूर्ण करून या कार्यालयास कळविण्याची व्यवस्था करावी म्हणजे त्यांचे इ. ११ वीस मान्यता देण्याचा प्रश्न लवकर विचारात घेता येईल व त्यामुळे विद्यार्थी व पालक यांची गैरसोय होणार नाही.

जोशी/